महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
महाराष्ट्र शासन उपक्रम (सीआयएनः यु४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८)
एच.डी.आय.एल टॉवर, 'ए' विंग, ४ था मजला, बांद्रा (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी क्र. ९१-२२-२६५८२४२४ विस्तारीत क्र.३५२
website:www.mahagenco.in Email ID-ciro@mahagenco.in

क्र. औसवि/वैवियो २०२४–२५/208/ 4961 दिनांक:– 17 MAY 2024

## परिपत्रक

**विषय**:– महानिर्मिती कंपनीत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांची वैद्यकीय विमा योजना २०२४–२५ साठी Online पध्दतीने महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर जाऊन माहिती अद्यावयत करणेबाबत.

**********

म.रा.वि.मंडळ सूत्रधारी कं. मर्या अंतर्गत महानिर्मिती कंपनीत दि. १.०५.२०२४ रोजी कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी वैद्यकीय विमा योजना २०२४–२५ चे नुतनीकरण करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

वैद्यकीय विमा योजना २०२३–२४ चे नुतनीकरण करताना काही अधिकारी/कर्मचारी यांची स्वत:ची नावे व त्यांच्यावर अवलंबितांची नावे वैद्यकीय विमा योजनेमध्ये अद्ययावत नसल्याने व वैद्यकीय विमा पॉलीसीमधील अटी व शर्ती कर्मचाऱ्यांना पुर्णपणे माहिती नसल्यामुळे वैद्यकीय विमा दावे रद्द करण्यात येत होते. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये मोठया प्रमाणात असंतोष निर्माण होत आहे.

तरी, महानिर्मिती कंपनीत दि. ०१.०५.२०२४ रोजी कार्यरत सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी वैद्यकीय विमा योजना २०२४–२५ करीता अवलंबितांची नावे वैद्यकीय विमा योजनेत समाविष्ट करण्यासाठी महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर जाऊन दि. १८.०५.२०२४ ते ३१.०५.२०२४ या कालावधीत नोंदणी करावी. जेणेकरुन भविष्यात वैद्यकीय विमा योजनेचा लाभ घेणे शक्य होईल.

वैद्यकीय विमा योजना २०२४–२५ करीता सर्व कर्मचाऱ्यांनी महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर जाऊन सोबत जोडलेल्या तक्त्यातील पध्दतीनुसार स्वत:ची व अवलंबितांची नावे वैद्यकीय विमा योजनेतील कुटुंबाच्या व्याख्येनुसार अद्ययावत करावी. तद्नंतर वैद्यकीय विमा योजना २०२४–२५ च्या कालावधीत कर्मचाऱ्यांना वैद्यकीय विमा योजनेकरीता अवलंबितांची नावे समाविष्ट करता येणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तसेच, सदर प्रक्रीयेमध्ये कोणतीही तांत्रिक अडचण उद्भवल्यास स्थानिक स्तरावरील माहिती तंत्रज्ञान/मानव संसाधन विभागाशी संपर्क साधावा.

सदर परिपत्रक महानिर्मिती कंपनीच्या https://esevarth.mahagenco.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याची मुद्रांकीत प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

**सोबत** :– अवलंबितांची नावे समाविष्ट करण्याची पध्दत

(डॉ. धनंजय सावळकर)
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रति,**
महानिर्मिती कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे

Eneeta2019/Policy 2022/MSEBHCL Policy 2024-25

महानिर्मिती कंपनीत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांची वैद्यकीय विमा योजना २०२४–२५ साठी स्वत:ची व अवलंबितांची माहिती अद्ययावत करणेसाठी ONLINE पध्दत खालीलप्रमाणे

Mahagenco Site

↓

SAP Dashboard

↓

User ID

↓

Passward

↓

Dashboard Open

↓

Select Tiles माझा परिवार
(For Mediclaim)

↓

Fill in the Blank
Employee Name
Automatic येईल

↓

Dependent ची नावे चेक करावी

↓

Submit

↓

Relationship Acknowledge